# संपादकीय

"नवज्योत" या आंतरविद्याशाखीय व बहुभाषिक संशोधन पत्रिकेचा हा नवा अंक वाचक, विद्यार्थी, संशोधक व प्राध्यापकांच्या हाती सुपूर्तक रताना मनस्वी आनंद होत आहे. समाज, राज्य, अर्थव्यवस्था, राजकीय चळवळी, आंतरराष्ट्रीय संबंध, भारतीय विचारपरंपरा अशा विविधअंगांना स्पर्श करणाऱ्या दर्जेदार संशोधन लेखनाचा संग्रह या अंकात साकारला आहे. राष्ट्रनिर्मितीच्या प्रक्रियेत संशोधनाचे स्थानअनन्यसाधारण आहे आणि हे संशोधन समाजाचे चिंतन अधिक समृद्ध करते, धोरणांना दिशा देते व विचारविश्वाला बौद्धिक भान देते.

प्रस्तुत 'नवज्योत' या अंकाचे वैशिट्य म्हणजे समाजाच्या वर्तमान समस्या व प्रश्नांवर ऐतिहासिक आणि समकालीन वस्तुनिष्ठ तथ्यांवर वशास्त्रीय पद्धतींवर आधारीत केलेले लिखाण होय. शोधकर्त्या लेखकांनी आपल्या शोधकार्यात विभिन्न विषय हाताळले असून आपल्याविषयाची मांडणी वस्तुनिष्ठपणे तथ्यावर केलेली दिसून येते. यामध्ये प्रामुख्याने डॉ. एस. जी. गावडे यांच्या 'Fostering Inclusive Growth through Structural Transformation in India' या लेखात भारतीय अर्थव्यवस्थेतील संरचनात्मक बदल, समावेशक वाढ, उत्पादनक्षमता, रोजगारनिर्मिती आणि धोरणात्मक आव्हाने यांचे सूक्ष्म विश्लेषण आढळते. भारत जागतिक अर्थव्यवस्थेत कोणत्या दिशेने प्रवास करत आहे, आणि समताधिष्ठित विकासासाठी काय आवश्यक आहे याचा हा संशोधननिष्ठ आढावा आहे. डॉ. रोहन अशोक शेडगे यांच्या 'A Study of Inter-Caste Marriages in Khatav Taluka in Satara District' या लेखात जातीय भेद, सामाजिक स्वीकार, कुटुंबीय प्रतिसाद, आणिआधुनिकतेच्या प्रक्रियेत बदलणारी विवाहसंस्कृती या सर्वांचे समाजशास्त्रीयपणे केलेले सूक्ष्म विश्लेषण ग्रामीण समाजाच्या बदलत्यामनोभूमीचे वास्तव दाखवते. डॉ. सत्याम कुमार यांच्या 'India-Sudan Relation: Understanding India's Engagement with Sudan' या लेखात भारताचे आफ्रिका धोरण, ऐतिहासिक पार्श्वभूमी, राजनैतिक संबंध, आर्थिक सहकार्य व सामरिक हितसंबंधांची सखोल मांडणी यालेखात पाहायला मिळते. जागतिक राजकारणात भारताच्या बहुविध सहभागाचे हे उत्तम उदाहरण आहे. डॉ. भावना सिंह यांच्या 'Unveiling the Forgotten Pioneers: Indian Rishis and Scientists and their Profound Contributions to Ancient Science and Technology' या लेखात भारतीय ऋषी, वैज्ञानिक, तांत्रिक परंपरा, आणि प्राचीन ज्ञानसंस्थांचे सूक्ष्म व संशोधनात्मक विश्लेषण भारतीयज्ञानपरंपरेच्या भक्कम पायांचा परिचय करून देते. विज्ञान-वाङ्मयातील भारतीय योगदानाची मौलिक पुनर्मांडणी या लेखात प्रभावीरीत्या सादरहोते. डॉ. राजू कमलेश सावंत यांच्या 'The Role of Youth Movements in Maharashtra: Shaping Contemporary Political Agendas' या लेखात महाराष्ट्रातील युवक चळवळी, त्यांची वैचारिक मुळे, सामाजिक-राजकीय प्रभाव आणि बदलत्या राजकारणातयुवकांची भूमिकेची मांडणी हे आजच्या काळासाठी अत्यंत संदर्भित विषय आहेत. लोकशाहीची नवी उर्जा कशी घडते याचा हा अभ्यास आहे. डॉ. एस. कुचेकर यांच्या 'भारतीय संघराज्यातील बदलते प्रवाह' या लेखात भारतीय संघराज्यव्यवस्था, केंद्र-राज्य संबंध, आर्थिक संघराज्य, राजकीय बदल आणि न्यायालयीन हस्तक्षेप यांच्या संदर्भातील प्रवाहांचे वस्तुनिष्ठ विश्लेषण भारतीय संविधानवादाची गतिशीलता दिसून येते. तर प्रा. विनायकराव जाधव यांचा 'भारताच्या प्राचीन समाजव्यवस्था' हा लेख वर्णव्यवस्था, आश्रमव्यवस्था, सामाजिक मूल्ये, आर्थिकसंघटना आणि सांस्कृतिक परंपरा यांच्या संदर्भातील भारतीय सामाजिक संरचनेच्या मूळ तत्त्वांचा अभ्यास करण्यास मदत करतो.

अशा या महत्त्वपूर्ण अंकाच्या संपादनाची संधी प्रदान केल्याबद्दल प्रकाशक, संस्थापक प्रा. डॉ. रवींद्र भणगे सर राज्यशास्त्र अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर यांच्याप्रती मी कृतज्ञता व्यक्त करतो.

आजच्या तंत्रज्ञानप्रधान, वेगवान आणि अनिश्चिततेने व्यापलेल्या काळात संशोधन हे समाजासाठी प्रकाशस्तंभ ठरत आहे. जागतिकीकरण, तंत्रज्ञानक्रांती, आंतरराष्ट्रीय संघर्ष, लोकशाहीतील बदलते प्रवाह, सामाजिक समता आणि आर्थिक विकास या सर्व स्तरांवर संशोधनात्मकविचार अधिक आवश्यक झाला आहे. "नवज्योत" ही परंपरा कायम ठेवत संशोधनाला सातत्य, दिशा व गुणवत्तेचा आधार देत आली आहे. याअंकातील सर्व लेख विविध क्षेत्रातील संशोधनाला ऊर्जा देणारे, वाचकांना विचार करायला भाग पाडणारे आणि सामाजिक प्रश्नांवर निर्णायकदृष्टिकोन देणारे आहेत. संशोधन पत्रिकेच्या अखंड प्रवासाला लेखकांनी दिलेल्या अमूल्य योगदानामुळेच "नवज्योत" अधिक समृद्ध होत आहे.

आपले मनःपूर्वक धन्यवाद...

**डॉ. सुखदेव उंदरे**
सहाय्यक प्राध्यापक,
राज्यशास्त्र अधिविभाग
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.